# सापळा केस

दिनांक २१/०९/२०२१

**आलोसे निलेश आंबादास अंभारे वय ३० वर्षे व्यवसाय ग्रामसेवक सज्जा कुपटा ता.सेलु जि.परभणी मुळ रा. गोवर्धन ता.रिसोड जि.वाशिम ह.मु.गणेश नगर सेलू (वर्ग ३) यांनी २,०००/— रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि. १७/०९/२०२१ रोजी तक्रार दिली की, ते वरील ठिकाणाचा राहणारे असून सध्या पुणे येथे लेबर सप्लायचे काम करतात. त्यांनी त्यांचे गावातील प्रताप गुलाबराव सोळंके रा.कुपटा ता.सेलु जि.परभणी यांचेकडुन दि. १२/०७/२०२१ रोजी गावातील मालमत्ता क्र. ४३२ ची मोकळी जागा रू ७४,०००/— ला खरेदी केलेली आहे. सदर मालमत्ता क्र. ४३२ ची मोकळी जागा ही त्यांचे नमुना नंबर आठ वर लावणेसाठी त्यांचे गावचे ग्रामसेवक श्री.आंभोरे यांना दि. १६/०९/२०२१ रोजी भेटले असता त्यांनी सदर प्लॉट हे नमुना नंबर आठ वर लावणेसाठीच्या कामाबददल लाचेची मागणी केली आहे. परंतु ग्रामसेवक श्री.आंभोरे यांनी त्यांचे कामासाठी मागीतलेली रक्कम ही लाच असल्याने त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. परंतु तक्रारदार यांनी जर ग्रामसेवक अंभोरे यांना लाच दिली नाही तर ते त्यांनी नमुद जागा नमुना नंबर आठ वर लावणार नाहीत म्हणून आपणाकडे तक्रार देण्यासाठी आले आहेत. ग्रामसेवक श्री.आंभोरे यांनी स्वत: अगर इतरांमार्फत लाचेची रक्कम मागणी करून स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत नमुद आलोसे यांनी दिनांक २१/०९/२०२१ रोजी तक्रारदार यांचे प्लॉट हे नमुना नंबर आठ वर लावणेसाठीच्या कामाबददल २,०००/— रूपये लाचेची मागणी केली. दि. २१/०९/२०२१ रोजी सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता आलोसे यांनी २०००/— रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली आहे. आलोसे यांना ताब्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे. सेलु येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

स्दरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती.कल्पना बारवकर, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्रीमती.स्वप्नाली धुतराज,पोह/हनुमंते, पोना/कटारे, पोशि/मुक्तार, पोशि/धबडगे, पोना/मुखीद, पोना/कुलकर्णी, चापोना/कदम, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचाराविरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाच लुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनीक्रमांक ०२४५२—२२०५९७**

**टोलफ्रीक्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५
श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ९६६५४७९३३३
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — ७०२१००२११०
श्रीमती.स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक ला. प्र. वि. परभणी — ८३०८२४१९००

Scanned with CamScanner